## ❖ भारत बांगलादेश दरम्यान नवीन रेल्वे सेवा सुरू होणार :

भारतातील कोलकत्यापासून बांगलादेशातील खुलना यादरम्यान नवीन रेल्वे सेवा सुरू करण्याच्या निर्णयाला हिरवा झेंडा दाखविण्यात आला आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बांगलादेशच्या परराष्ट्रमंत्री शेख हसीना यांच्यात 9 नोव्हेंबर रोजी व्हिडिओ कॉन्फरन्स झाली. या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये हा निर्णय घेण्यात आला.
दोन शेजारी राष्ट्रांच्या संबंधांच्या आड आंतरराष्ट्रीय शिष्टाचाराची औपचारिकता (प्रोटोकॉल) येता कामा नये असे मत व्यक्त करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी बोलताना म्हणाले, "दोन्ही देशांतील जास्तीत जास्त नागरिकांना एकमेकांच्या संपर्कात राहण्याकरिता प्रोत्साहन दिले पाहिजे."

"आज आमादेर मैत्री बंधन अरो शुभोड होलो" असे बंगाली भाषेत म्हणत पंतप्रधान मोदी यांनी बैठकीच्या सुरवातीला "आज आपल्यातील मित्रत्वाचे संबंध अधिक दृढ झाले" असे मत व्यक्त केले. "या नव्या रेल्वे सेवेमुळे कोलकाता ते ढाका संपर्क आज शक्य झाला आहे. यामुळे लोकांना विनातक्रार आणि सोयीस्कर प्रवास करता येईल. हे बांगलादेश आणि भारत यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधाचे फलित आहे," असेही मोदी म्हणाले.

## ❖ अल्फिया शेखने 'स्ट्राँगेस्ट वुमन'चा किताब पटकावला :

पॉवरलिफ्टिंगसारख्या खेळात अल्फिया शेखने आतापर्यंत 35 सुवर्णपदके जिंकली. नऊवेळा 'स्ट्राँगेस्ट वुमन'चा किताब पटकावला. शिवाय आंतरराष्ट्रीय स्पर्धेतही 'चॅम्पियन' झाली.
मात्र, या कामगिरीनंतरही ती उपेक्षेचे जीणे जगत आहे. हलाखीच्या परिस्थितीमुळे नागपूरकन्येला या खेळात टिकून राहण्यात अनेक अडचणी येताहेत. मदत किंवा नोकरी मिळाल्यास आपण खेळावर आणखी लक्ष केंद्रित करून नागपूरसह देशाला नावलौकिक मिळवून देऊ शकते, असे तिचे म्हणणे आहे.
काटोल रोड, फ्रेण्ड्स कॉलनीत राहणाऱ्या 19 वर्षीय अल्फिया शेखने तीन वर्षांपूर्वी पॉवरलिफ्टिंगमध्ये पाऊल ठेवले. कुणाचेही बळ नसताना अथक परिश्रम व स्वत:च्या गुणवत्तेवर अल्पावधीतच तिने यश संपादन केले.